1 2 OCT 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वृद्धिंगत करूया

## प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांचे पदग्रहणानंतर आवाहन



कोल्हापूर : प्रतिनिधी

सुसंवाद, विश्वास आणि पारदर्शकता या मूल्यांवर आधारित कार्य करून शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वृद्धिंगत करण्यासाठी सर्व जण मिळून प्रयत्न करूया, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असलेल्या डॉ. गोसावी यांनी शनिवारी शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारला, त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी शनिवारी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेश केला. त्यानंतर कुलगुरू दालनामध्ये प्रभारी कुलगुरुपदाचा कार्यभार त्यांनी स्वीकारला. यावेळी त्यांच्यासमवेत त्यांची पत्नी अर्चना गोसावी उपस्थित होत्या. कार्यभार स्वीकारल्यानंतर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांचे शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने व्यवस्थापन परिषद सभागृहामध्ये औपचारिक स्वागत करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते त्यांचे सपत्नीक स्वागत करण्यात आले. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव लाभलेल्या आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचारकार्याचा वारसा लाभलेल्या हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू म्हणून काम करण्याची संधी लाभली, याबद्दल मला अतिशय आनंद वाटत आहे. यापूर्वी छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू म्हणून काम करण्याची संधीही मला लाभली होती. त्यामुळे फुले, आंबेडकर आणि शाहू या त्रयींच्या संगमावर काम करता आले, याचे समाधानही वाटते, असेही प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले

कुलगुरू डॉ. गोसावी यांनी दालनात जाऊन लगेच आपल्या कामकाजाला सुरुवात केली, तसेच विविध विभागांच्या नस्ती पाहून त्या मार्गी लावल्या. त्यानंतर पुणे विद्यापीठाच्या पूर्वनियोजित ऑनलाईन बैठकीमध्ये त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, संगणक केंद्र संचालक अभिजित रेडेकर, माजी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. मेघा गुळवणी, व्यवस्थापन परिषद सदस्य स्वागत परुळेकर, डॉ. मंजिरी मोरे, अधिसभा सदस्य धैर्यशील यादव, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. किरण कुमार शर्मा, डॉ. राहुल माने, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, पुणे विद्यापीठाचे उपकुलसचिव प्रदीप कोळी आणि सुरेश भोसले आदी उपस्थित होते.

### श्री अंबाबाईचे घेतले सपत्नीक दर्शन

कार्यालयीन कामकाज उरकल्यानंतर सायंकाळच्या सत्रात प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांनी सपत्नीक श्री अंबाबाईदेवीचे दर्शन घेतले. त्यानंतर बिंदू चौक येथील हुतात्मा स्मारक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांचा पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांचा पुतळा, राजर्षी शाहू महाराजांचे समाधी स्थळ, दसरा चौक येथील छत्रपती शाहू महाराजांचा पुतळा आणि कावळा नाका येथील करवीर राज्य संस्थापिका छत्रपती ताराराणी यांच्या पुतळ्यासही अभिवादन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 OCT 2025
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांचे प्रशासनाच्या वतीने ग्रंथभेट देऊन स्वागत करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत अर्चना गोसावी आणि अधिकारी व शिक्षक. (छाया : नाज ट्रेनर)

# प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांनी कार्यभार स्वीकारला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सुसंवाद, विश्वास आणि पारदर्शकता या मूल्यांवर आधारित कार्य करून शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वृद्धिंगत करण्यासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करू या, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असलेल्या डॉ. गोसावी यांनी शनिवारी सकाळी कार्यभार स्वीकारला. त्यावेळी उपस्थित अधिकार मंडळांचे सदस्य, शिक्षक व अधिकारी यांना संबोधित करताना ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. गोसावी यांनी विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करून मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेश केला. त्यानंतर कार्यभार स्वीकारला. यावेळी त्यांच्यासमवेत पत्नी अर्चना गोसावी उपस्थित होत्या. कुलगुरू डॉ. गोसावी यांचे विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

कुलगुरू डॉ. गोसावी यांनी दालनात जाऊन लगेचच कामकाजाला सुरुवात केली. विविध विभागांच्या नस्ती

**● सुसंवाद, विश्वास, पारदर्शकता या त्रिसूत्रीनुसार काम करण्याचे आवाहन**

मार्गी लावल्या. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, अभिजित रेडेकर, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. मेघा गुळवणी, स्वागत परुळेकर, डॉ. मंजिरी मोरे, धैर्यशील यादव उपस्थित होते.

सायंकाळी डॉ. गोसावी यांनी सपत्नीक अंबाबाई मंदिरात जाऊन देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर बिंदू चौक येथील हुतात्मा स्मारक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या पुतळ्यांना पुष्प वाहून अभिवादन केले. तेथून छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. राजर्षी शाहू महाराज यांच्या समाधीस्थळी जाऊन त्यांच्या प्रती आदरांजली व्यक्त केली. दसरा चौक येथे राजर्षी शाहू महाराज पुतळा व कावळा नाका येथील महाराणी ताराराणी यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून त्यांनी अभिवादन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 OCT 2025
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना ग्रंथ भेट देऊन त्यांचे स्वागत करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. शेजारी अर्चना गोसावी, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. शरद बनसोडे आदी.

# विद्यापीठाचा लौकिक वृद्धिंगत करूया : डॉ. सुरेश गोसावी

## प्रभारी कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारला

कोल्हापूर, ता. ११ : 'शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वृद्धिंगत करण्यासाठी सर्वजण प्रयत्न करूया', असे आवाहन प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी आज येथे केले.

डॉ. गोसावी यांनी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारला. त्यावेळी ते बोलत होते. व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात त्यांचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वागत झाले. कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी कामकाजाला सुरूवात केली. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू आहेत. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन करून मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेश केला. त्यांच्यासमवेत पत्नी अर्चना गोसावी उपस्थित होत्या.

डॉ. गोसावी म्हणाले, 'विद्यापीठाने सुसंवाद, विश्वास व पारदर्शकतेच्या मूल्यांवर आधारित कार्य केले आहे. छत्रपती शिवरायांचे नाव व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचार कार्याचा वारसा लाभलेल्या हीरकमहोत्सवी विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू म्हणून काम करण्याची संधी लाभल्याचा आनंद आहे. या संधीबद्दल कुलपतींचे आभार मानतो. यापूर्वी छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू म्हणून काम करण्याची संधी मिळाली होती. त्यामुळे फुले, शाहू, आंबेडकर या त्रयींच्या संगमावर काम करता आले, याचेही समाधान आहे.'

याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, संगणक केंद्र संचालक अभिजित रेडेकर, माजी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. मेघा गुळवणी, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य स्वागत परुळेकर, डॉ. मंजिरी मोरे, अधिसभेचे सदस्य धैर्यशील यादव, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. किरणकुमार शर्मा, डॉ. राहुल माने, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, पुणे विद्यापीठाचे उपकुलसचिव प्रदीप कोळी व सुरेश भोसले उपस्थित होते.

कार्यालयीन कामकाज उरकल्यानंतर सायंकाळच्या सत्रात डॉ. गोसावी यांनी सपत्नीक श्री अंबाबाई मंदिरात जाऊन देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर बिंदू चौक येथील हुतात्मा स्मारक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. राजर्षी शाहू महाराज यांच्या समाधिस्थळी जाऊन त्यांच्याप्रती आदरांजली व्यक्त केली. दसरा चौकातील राजर्षी शाहू महाराज, तर कावळा नाका येथील करवीर राज्य संस्थापिका छत्रपती ताराराणी यांच्या पुतळ्यासही पुष्प वाहून अभिवादन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 OCT 2025
तरुण भारत

# प्रभारी कुलगुरूपदी डॉ. गोसावी रूजू

- शिवाजी विद्यापीठाचा नावलौकीक वृद्धीगंत करण्याची दिली ग्वाही
- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून कामाला सुरुवात



**कोल्हापूर : प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांचे स्वागत करताना कुल-सचिव डॉ. विलास शिंदे. सोबत अर्चना गोसावी आदी मान्यवर.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठासाठी नव्याने नियुक्त झालेले प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी शनिवारी कार्यभार स्विकारला. कार्यभार स्विकारल्यानंतर पहिल्याच दिवशी त्यांनी प्रत्यक्ष कामकाजाला सुरूवात केली. सुसंवाद, विश्वास आणि पारदर्शकता या मूल्यांवर आधारित कार्य करून शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक वृद्धिंगत करण्यासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करू या, असे आवाहन डॉ. गोसावी यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असलेल्या डॉ. गोसावी यांची शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी नियुक्ती झाली. शिवाजी विद्यापीठात दाखल होताच त्यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळयास अभिवादन करून मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेश केला. यावेळी त्यांच्यासमवेत पत्नी अर्चना गोसावी होत्या. कुलगुरू दालनामध्ये प्रभारी कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी अधिकार मंडळांचे सदस्य, शिक्षक व अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

## पहिल्याच दिवशी कामकाजाला सुरूवात

डॉ. गोसावी यांनी पहिल्याच दिवशी प्रत्यक्ष कामकाजाला सुरवात केली. कार्यालयात आलेल्या विविध विभागांच्या नस्ती पाहून त्या मार्गी लावल्या. त्यानंतर पुणे विद्यापीठाच्या पूर्वनियोजित ऑनलाईन बैठकीमध्ये येथूनच सहभागी होऊन मार्गदर्शन केले.

प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांचे प्रशासनाच्या वतीने व्यवस्थापन परिषद सभागृहात स्वागत करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते त्यांचे सपत्नीक स्वागत करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 OCT 2025
लोकमत



शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वागत केले.

# प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी कार्यभार स्वीकारला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सुसंवाद, विश्वास आणि पारदर्शकता या मूल्यांवर आधारित कार्य करून शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वृद्धिंगत करण्यासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करूया, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी शनिवारी केले.

डॉ. गोसावी यांनी शनिवारी सकाळी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारला. प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करून मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये त्यांनी प्रवेश केला. यावेळी त्यांच्यासमवेत पत्नी अर्चना गोसावी याही उपस्थित होत्या. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ आणि ग्रंथभेट देऊन कुलगुरुंचे सपत्नीक स्वागत करण्यात आले. यानंतर कुलगुरू डॉ. गोसावी यांनी आपल्या दालनात जाऊन लगेचच कामकाजाला सुरुवात केली. कार्यालयात आलेल्या विविध विभागांच्या नस्ती पाहून त्या मार्गी लावल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 OCT 2025
पुण्यनगरी

# शैक्षणिक धोरणाची माहिती घेणे गरजेचे : उपकुलसचिव

**नणुंद्रे : प्रतिनिधी**

शिक्षण प्रक्रियेतील सर्व घटकांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत माहिती करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाची वेबसाईट पाहावी. अभ्यासक्रमाची ध्येय, उद्दिष्ट्ये समजून घ्या, शिक्षण पद्धती चिकित्सक व अभ्यासूवृत्तीने समजून घ्या, विद्यार्थ्याला आवडेल ते विषय निवडून शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे, त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी केले. श्रीपतराव चौगुले आर्टस् अँड सायन्स कॉलेज, माळवाडी, कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व अग्रणी महाविद्यालय योजना यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व बदलते परीक्षेचे स्वरूप' या विषयावर आयोजित केलेल्या एकदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात 'महाविद्यालयीन विद्यार्थी व ताणतणाव व्यवस्थापन' या विषयावर सहज योग ध्यान केंद्राचे नीलेश नाडगोंडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे उद्घाटन ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शिवाजीराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, डॉ. बी. एन. रावण यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सचिव शिवाजीराव पाटील, डॉ. एस. एस. कुरुकलीकर, चंद्रकांत पोवार, आशिष कसबेकर, डॉ. भारती शिंदे, प्रा. पी. डी. माने डॉ. एम. के. कांबळे उपस्थित होते.

12 OCT 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घाळी महाविद्यालयाला चौथ्यांदा विजेतेपद

## आंतरविभागीय विद्यापीठ हॉकी ; कृष्णा माने चमकली

सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. ११ : येथील डॉ घाळी महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला हॉकीचे सलग चौथ्यांदा विजेतेपद पटकावून दबदबा राखला. अंतिम सामन्यात विटा महाविद्यालयावर तब्बल आठ गोल नोंदवून दणदणीत कामगिरी केली. स्पर्धेत घाळी महाविद्यालयाने तब्बल डझन गोल नोंदवून प्रतिस्पर्ध्यांना लोळविले. कर्णधार राष्ट्रीय खेळाडू कृष्णा माने हिने चौफेर खेळ करत सर्वाधिक सात गोल नोंदवत विजेतेपदाची शिल्पकार ठरली.

### विजेतेपद पटकाविलेला संघ असा :

कृष्णा माने, अमृता जाधव, सानिका चिरमुरे, तेजश्री खंदाळे, माधुरी भोसले, अनुदी चव्हाण, मोनिका आरबोळे, स्वप्नाली माने, महानंदा मास्तोळी, मनीषा देसाई, वासंती वाडगोळ, प्रतीक्षा कोळी, सारिका आरबोळे, सानिका नगरे.

उपांत्य सामन्यात कऱ्हाडच्या शासकीय महाविद्यालयाला ४-० असे पराजित करून घाळी महाविद्यालयाने दिमाखात अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यातही घाळी महाविद्यालयाच्या मुलींनी चेंडूवर सातत्याने ताबा ठेवत विटा संघाला प्रतिकाराची संधीच दिली नाही. एकापाठोपाठ गोलचा वर्षाव करत विटा संघाला नामोहरम केले. खासकरून अनुभवी कृष्णा माने हिने हॅट्ट्रिकसह पाच गोल नोंदवून प्रतिस्पर्ध्यांना सळो कि पळो करून सोडले. संघाला क्रीडा संचालक विकास अतिग्रे, मनोहर मांगले यांचे मार्गदर्शन मिळाले. संस्थेचे अध्यक्ष सतीश घाळी यांच्याहस्ते विजेत्या संघातील खेळाडूंचा गौरव करण्यात आला.



गडहिंग्लज : आंतरविभागीय हॉकीचे विजेतेपद पटकाविणाऱ्या घाळी महाविद्यालयाचे खेळाडू मार्गदर्शकासमवेत.

यावेळी संस्थेचे प्राचार्य डॉ. दत्ता पाटील, उपप्राचार्य डॉ नागेश मासाळ, प्रमोद पुजारी यांच्यासह विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.